# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/07/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :— दिनांक १५/०७/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान फिर्यादी हिचे पती सोबत पटत नल्याने सन २०१८ मध्ये सोडचिठ्ठी झालेली आहे. फिर्यादी ही दोन मुलीसह राहते. फिर्यादीची **आरोपी नामे— हेमराज यादवराव येडे, रा. नागपूर** याचेशी ओळखी झाली. त्याचे सोबत लग्न न करता मुलीसह राहत होती आरोपी हेमराज येडे हा दारू पिण्याच्या सवईचा आहे तो नेहमी झगडा भांडण करून मारहान करित होता. म्हणुन फिर्यादी ही दोन महिन्यापासुन वेगळी राहत आहे. आरोपी हा फिर्यादीचा नेहमी पाठलाग करतो. दिनांक १४/०७/२०२३ ला फिर्यादी ही बोरी बाजारात भाजीपाला घेण्यासाठी गेली तेव्हा आरोपी हा बाजारात पाठीमागे आला व म्हणाला की माझे सोबत चल असे म्हणुन फिर्यादीचा हात पकडला नकार दिला असता आरोपी याने फिर्यादी यांचेशी शिवीगाळ करून केस पकडले दिनांक १५/०७/२०२३ रोजी रा्त्री ०९/०० वा. सुमारास फिर्यादी ही घरी हजर असताना आरोपी हा घरात शिरला व फिर्यादी यांचा हात पकडुन जोराने खेचला व माझे सोबत चल असे म्हणाला फिर्यादीने आरडा ओरड केली तेव्हा आरोपी तेथुन निघुन गेला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३५४(ड), ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार टेकाम मो. नं. ९०२१४०७३२१ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही :— पो.स्टे. कुही हद्दीत दिनांक १६/०७/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादीची पत्नी वय ४३ वर्ष व एक मुलगा व एक मुलगी असे त्याचा परीवार असुन फीर्यादीची पत्नी ही बचत गटाची सदस्य असुन बचत गटातील इतर महीलांकडुन पैसा जमा करीत असते. घटना वेळी व ठीकाणी फिर्यादीची पत्नी ही फिर्यादीच्या स्वत:च्या परमात्मा पशु खादय व किराणा दुकान येथे हजर असताना दोन तीन महीला आरोपी क्र. १) व २ तसेच इतर असे फिर्यादीच्या दुकानामध्ये येवुन फिर्यादीच्या पत्नीला म्हणाले की तुमच्या बचत गटाचे पैशाचे व्यवहार बरोबर नाही तुम्ही आमचे पैसे कधी देणार आहे अजुनपर्यंत आमचे पैसे का परत केले नाही असे म्हणुन फिर्यादीच्या पत्नीसोबत भांडण करून फिर्यादीच्या पत्नीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी देवुन चारचाकी वाहनात जबरदस्तीने बसवुन घेवुन गेले. त्यावेळी दुकानाचे किरायदार मालक व त्याची पत्नी हजर होते व तिला म्हणत होते की तुम्ही येथुन निघुन जा असे म्हणुन त्यांनासुध्दा ढकलढुकल केले. फिर्यादीच्या पत्नीकडे असलेला मोबाईल नंबर सुध्दा बंद स्थीतीत दाखवीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ३६३, ५०४, ५०६, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संतोष डोर्लीकर पोस्टे कुही मो. नं. ९५९५६७८२३४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर